## प्रकरण - 2

## नियमावली : 1

**संस्थेची वैशिष्टये, कार्य आणि कर्तव्ये :**

सन 1888चा मुंबई अधिनियम क्र. 3 असलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 63 (इ) अन्वये, सार्वजनिक उपवने, उद्याने अथवा मनोरंजन मैदाने (जलतरण तलाव) उभारणे अथवा ती सुस्थितीत ठेवणे हे बृहमुंबई महानगरपालिकेचे स्वेच्छाधिन कर्तव्य आहे. बृहमुंबई महानगरपालिकेच्या तरण तलावात सर्वसाधारण जनतेस पोहण्यास शिकवण्यासाठी पोहण्यासाठी संधी उपलब्ध करुन मनोरंजन सुविधा देणे हे मुंबई महानगरपालिकेचे कार्य आहे.

**घाटकोपर लायन्स तरण तलाव, घाटकोपर :**

सन 1971 मध्ये घाटकोपर लायन्स जलतरण तलाव बांधण्यात आला आणि दरवर्षी सुमारे 7000 सदस्य सदर पुलाचा फायदा घेत आहेत. तरण तलावासमोरील मोकळा भूभाग जनतेस विविध कार्यक्रमासाठी भाडयाने देण्यात येतो.

## आकृतीबंध रचना

**महानगरपालिका आयुक्त**

**अति. मनपा. आयुक्त**

**महानगरपालिका उप-आयुक्त (उद्याने व सुरक्षा)**

**सहाय्यक व्यवस्थापक**

**लिपिक** | **तांत्रिकी कर्मचारी व श्रमिक कर्मचारी**

तरण तलावाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा आणि जनतेच्या तक्रारीवर देखरेख करण्यासाठी, घाटकोपर लायन्स महानगरपालिका तरण तलाव, घाटकोपरच्या कार्यालयात तक्रार वही ठेवण्यात आलेली आहे. सदस्य व जनता ह्याजकडून वेळोवेळी येणाऱ्या तक्रारींची दखल घेण्यात येते आणि देण्यात येणाऱ्या सुविधांत सुधारणा व आलेल्या जनतेच्या तक्रारीची तीव्रता (गांभीर्य) लक्षात घेऊन त्यांची तड ह्याबाबत

काळजी घेण्यात येते. तक्रारीचे स्वरुप लक्षात घेऊन त्या संबंधित अधिकारयांकडे योग्य त्या कार्यवाही आणि निर्णयार्थ पाठविण्यात येतात.